मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com
» पुणे, पिंपरी-चिंचवड
» सोमवार, दि. 23 डिसेंबर 2024 | पान- 1

# पिंपरी-चिंचवडला वॉटर प्लस सिटी बनवण्यासाठी केंद्रीय मंत्र्यांना साकडे

## खासदार श्रीरंग बारणे यांनी घेतली जलशक्ती मंत्री सी.आर. पाटील यांची भेट : कारखान्यांमधील रसायनमिश्रित पाण्यामुळे इंद्रायणी, पवना नदीच्या प्रदूषणाचा मुद्दा गंभीर झाला

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील कारखान्यांमधील रसायनमिश्रित पाण्यामुळे इंद्रायणी, पवना नदीच्या प्रदूषणाचा मुद्दा गंभीर झाला आहे. त्यामुळे मोठ्या संख्येने सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) उभारण्याची आवश्यकता आहे. पिंपरी-चिंचवडला वॉटर प्लस सिटी बनवण्यासाठी निधी देण्याची मागणी खासदार श्रीरंग बारणे यांनी जलशक्ती मंत्री सी.आर. पाटील यांच्याकडे केली आहे.



महाराष्ट्र सरकारच्या पर्यावरण आणि हवामान बदल विभागाने 22 सप्टेंबर 2023 रोजी इंद्रायणी नदीच्या संवर्धनासाठीचा प्रकल्प अहवाल सादर केला आहे. राष्ट्रीय नदी संवर्धन योजने अंतर्गत इंद्रायणी नदीचे पुनरुज्जीवन आणि संवर्धन करण्याच्या प्रस्तावाला मान्यता द्यावी. इंद्रायणी नदीचे पुनरुज्जीवन पुणे महानगर प्रदेशाच्या पर्यावरणीय शाश्वतता आणि कल्याणासाठी महत्त्वपूर्ण आहे. वेळेवर मंजुरी मिळाल्याने नदीचे पर्यावरणीय संतुलन पुनर्संचयित करण्यासाठी आवश्यक पावले उचलणे शक्य होईल. हा प्रस्ताव लवकरात लवकर मंजूर करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देण्याची मागणीही खासदार बारणे यांनी केली. त्याला सकारात्मक प्रतिसाद देत योग्य ते निर्देश देण्याची ग्वाही मंत्री पाटील यांनी दिली.

महापालिकेने 15 जानेवारी 2014 रोजी राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालय, जलशक्ती मंत्रालय यांच्याकडे प्रदूषण कमी करणारे प्रकल्प राबविण्यासाठी एकूण प्रकल्प खर्चाच्या 60 टक्के निधी मिळण्यासाठी प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेअंतर्गत सांडपाणी पाण्याचा पुनर्वापर करण्यासाठी निधी देऊन सहकार्य करण्याची विनंती खासदार बारणे यांनी केली आहे.

### वॉटर प्लस सिटी म्हणजे काय?

- नदी, नाल्यामध्ये काळे, रसायनमिश्रित पाणी जाऊ नये.
- नदी स्वच्छ वाहिली पाहिजे. नदी, नाले स्वच्छ असलेल्या शहराला वॉटर प्लस सिटी प्रमाणपत्र दिले जाते.
- राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेअंतर्गत इंद्रायणी नदीचे पुनरुज्जीवन आणि संवर्धन करा.

# जलतरण तलाव खासगीकरणास विरोध

## जलतरण तलाव खासगी संस्थांना चालविण्यास देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेकडून व्यापारी उद्देशाने दहा जलतरण तलाव खासगी संस्थांना चालविण्यास देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. काही ठराविक ठेकेदारांना पोसण्यासाठी हा उद्योग करण्यात आला असून, त्याचा भुर्दंड सर्वसामान्य करदात्या नागरिकांच्या माथी पडणार आहे. मनमानी व हुकूमशाही पद्धतीने घेतलेला हा निर्णय त्वरित रद्द करण्यात यावा, अशी मागणी वुई टुगेदर फाउंडेशनने केली आहे.



सर्व तलावांचे संचालन आणि व्यवस्थापन महापालिकेने करावे, आदी मागण्यांसाठी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची शिष्टमंडळाने भेट घेऊन निवेदन दिले आहे. शिष्टमंडळात अध्यक्ष सलीम सय्यद, सचिव जयंत कुलकर्णी, खजिनदार दिलीप चक्रे, सदस्य जाकीर सय्यद, इक्बाल आत्तार, रवींद्र काळे उपस्थित होते.

या निवेदनावर वुई टुगेदर फाउंडेशनचे संस्थापक सदस्य क्रांतिकुमार कडुलकर, सल्लागार मधुकर बच्चे, दिलीप पेटकर, धनंजय मांडके, मोहम्मद शेख, नीलेश आवारे, अर्जुन पाटोळे, राजीव सुभेदार, पांडुरंग खलाने, विलास रासकर, रवींद्र इंगळे, रणजित सोमवंशी, स्वाती पाठक, सोनाली मन्हास, वासंती काळे, मंगला डोळे, अतुल शेठ, श्वेता जहागीरदार, प्रमोद आढाव, डॉ. पार्श्वनाथ वेलापुरे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

याविषयी माहिती देताना केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आपल्या एक्स अकाऊंटवर पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले आहे.

# शेलारवाडीत रंगला मॉक ड्रीलचा थरार

## पुणे रेल्वे विभाग व एनडीआरएफचा संयुक्त उपक्रम

**पिंपरी | प्रतिनिधी**

आपत्कालीन परिस्थितीत बचाव व मदतकार्य प्रभावीपणे, तत्परतेने व सतर्कतेने राबवून अपघातात प्रवाशांना कशी मदत करता येईल, यासाठी पुणे रेल्वे विभागातर्फे शुक्रवारी (दि.20) संयुक्तपणे मॉक ड्रीलचे आयोजन करण्यात आले होते. पुणे – लोणावळा रेल्वे मार्गाच्या पुणे रेल्वे विभागाच्या बेगडेवाडी स्थानकावर 01234 पेरांबूर – प्रयागराज कुंभ एक्स्प्रेस या ट्रेनच्या दोन डब्यांच्या अपघाताची माहिती स्टेशन मास्टरला मिळाल्यानंतर, सर्व संबंधित विभागांना रेल्वे नियंत्रणाद्वारे तत्काळ माहिती देण्यात आली.



कार्यालयाने माहिती दिली आणि पुणे स्थानकातून अपघाती मदत गाडी आणि वैद्यकीय मदत गाडी अपघातस्थळाकडे रवाना करण्यात आली.विभागीय रेल्वे व्यवस्थापक इंदू राणी दुबे, अतिरिक्त विभागीय रेल्वे विभागीय रेल्वे व्यवस्थापक ब्रिजेश कुमार सिंग यांच्यासह वैद्यकीय पथक, रेल्वेचे इतर अधिकारी आणि रेल्वे संरक्षण दल तत्काळ अपघातस्थळी पोहोचले आणि मदत व बचाव कार्य युद्धपातळीवर पार पडले.

या अपघाताची माहिती एनडीआरएफ एमसीओ आणि स्थानिक प्रशासन, पोलीस, राज्य सरकारच्या वैद्यकीय विभागाला देण्यात आल्यानंतर त्यांनी कोणताही विलंब न लावता आपापल्या टीमसह अडकलेल्या प्रवाशांच्या मदत आणि बचाव कार्यात सहभाग घेतला. अपघात निवारण कर्मचारी आणि एनडीआरएफने त्यांना विविध साधनांच्या साहाय्याने बाहेर काढले.

रेल्वेच्या वैद्यकीय पथकाने घटनास्थळी पोहोचून जखमी प्रवाशांवर आवश्यक प्राथमिक उपचार करून त्यांना राज्य सरकारने उपलब्ध करून दिलेल्या रुग्णवाहिकेतून जवळच्या रुग्णालयात उपाचाराकरिता दखल केले.

मदत आणि बचाव कार्यादरम्यान, एनडीआरएफ कमांडंट एस. बी. सिंग, डेप्युटी कमांडंट प्रवीण धस, वरिष्ठ विभागीय यांत्रिक अभियंता शादाब जमाल व विजयसिंह दडस, वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता नारायण माहेश्वरी, वरिष्ठ विभागीय अभियंता मनीष सिंह , वरिष्ठ विभागीय सुरक्षा अधिकारी राजेंद्रकुमार कथल, पुणे रेल्वे रुग्णालयाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी एन.के. संजीव, वरिष्ठ विभागीय व्यावसायिक व्यवस्थापक डॉ. मिलिंद हिरवे, सहायक विभागीय सुरक्षा अधिकारी दिलीप तायडे आदी उपस्थित होते.

# झेडपीची कंत्राटी शिक्षक भरती थांबली

## 'टीईटी'चा निकाल फेब्रुवारीत तर 'टेट' जूनमध्ये, पटसंख्या कमी असलेल्या शाळांबाबत नव्या सरकारच्या निर्णयाची प्रतीक्षा

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील भरती प्रक्रिया पुन्हा थांबली आहे. यामुळे पटसंख्या कमी असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये कंत्राटी शिक्षकांच्या भरतीचा निर्णय लांबणावर गेला आहे.

राज्यसरकारकडून जिल्हा परिषदेच्या ज्या शाळांमध्ये १ ते २० विद्यार्थीसंख्या (पट) आहे. अशा सर्व शाळांवर सेवानिवृत्त शिक्षक नेमण्याचा शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला. त्यानंतर त्या निर्णयात अचानक बदल करून दहापर्यंत पटसंख्या असलेल्या शाळांवर कंत्राटी शिक्षक डीएड, बीएडधारक सुशिक्षित तरुण-तरुणींना नेमण्याचा निर्णय झाला. आता पुन्हा तो निर्णय थांबविण्यात आला असून कमी पटसंख्येच्या झेडपी शाळांवरील शिक्षकांचा प्रश्न 'जैसे थे' आहे. शालेय शिक्षण विभागाला यासंदर्भात आता नवीन शिक्षणमंत्र्यांच्या आदेशाची प्रतीक्षा आहे.

राज्यातील १४ हजार ७८३ शाळांमधील पटसंख्या १ ते २० पर्यंत असून त्यात पुणे जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ३,६२९ पैकी एक हजारापेक्षा जास्त शाळा आहेत. त्यात ३०० हून जास्त शाळांचा पट दहापेक्षा कमी आहे. या शाळांवर कंत्राटी शिक्षक घेण्याचा निर्णय झाला होता. पण, त्याची कार्यवाही थांबल्याने शासनाच्या धरसोड भूमिकेवर डीएड-बीएडधारक तरुण-तरुणी वैतागले आहेत.

राज्यात ३० ते ३२ हजार शिक्षकांची भरती केली जाईल, अशी ग्वाही तत्कालीन शिक्षणमंत्र्यांनी दिली होती. मात्र, अजूनही जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये सात हजारांवर शिक्षक कमीच आहेत. अजूनही समानीकरणाअंतर्गत हजारो शाळांमध्ये पटसंख्येच्या तुलनेत शिक्षक भरलेले नाहीत.

'टीईटी' पार पडल्यानंतर या परीक्षेचा निकाल फेब्रुवारीअखेर अपेक्षित आहे. उत्तीर्ण झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याचे पेपर बारकाईने तपासले जात आहेत. प्रत्येक उत्तराला अचूक गुण दिल्याची खात्री अधिकाऱ्यांकडून केली जात आहे. त्यामुळे निकालास आणखी दीड ते दोन महिने लागू शकतात. त्यानंतर 'टीईटी'त उत्तीर्ण विद्यार्थ्यांची जून-जुलैमध्ये 'टेट' घेण्याचे नियोजन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने केले आहे.



### नववर्षात 10 हजार पदे भरण्याची शक्यता

» आता पवित्र पोर्टलच्या माध्यमातून नवीन वर्षात शिक्षक भरती होणार असून ज्या जिल्हा परिषदांमधील शिक्षकांच्या रिक्तपदांचे रोस्टर (बिंदूनामावली) अचूक आहे, कोणाचीही हरकत नाही तेथील ८० टक्के पदभरती होणार आहे. दुसरीकडे खासगी अनुदानित माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती देखील झालेली नाही. नवीन वर्षात शालेय शिक्षण विभागाकडून शिक्षक भरतीची खुशखबर येवू शकते. जवळपास १० हजार शिक्षकांची भरती होवू शकते, असे शालेय शिक्षण विभागातील वरिष्ठ सूत्रांनी सांगितले.

### शालेय शिक्षण विभागाच्या सूचनांची प्रतीक्षा

» दहापेक्षा कमी पटाच्या शाळांवर कंत्राटी शिक्षक घेण्याचा निर्णय यापूर्वीच झाला आहे. त्यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार कार्यवाही केली जाईल. शालेय शिक्षण विभागाकडून त्या मार्गदर्शक सूचनांची प्रतीक्षा आहे, असे पुणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले.

### कमी पटसंख्या जिल्हानिहाय शाळांची संख्या

» पुणे (१,०७९), सोलापूर (५३१), सातारा (९१७), नगर (६९६), धुळे (१२७), नंदुरबार (१९७), जळगाव (८८), बुलढाणा (१२५), अकोला (१६५), वाशीम (९२), अमरावती (३३६), वर्धा (२५४), नागपूर (४६४), भंडारा (१२६), गोंदिया (२१५), गडचिरोली (६६९), यवतमाळ (३६०), नांदेड (३६५), हिंगोली (७३), परभणी (१३२), जालना (२१३), औरंगाबाद (४४३), नाशिक (५०९), ठाणे (६२५), मुंबई (३१), रायगड (१,१९२), बीड (४६७), लातूर (१७९), उस्मानाबाद (१५६), रत्नागिरी (१,१२६), सिंधुदुर्ग (६९३), कोल्हापूर (४८०), सांगली (३७८).

# सरकार बदलले, शाळेचा गणवेशही बदलला

## जुना नियम रद्द : जबाबदारी पुन्हा शाळा व्यवस्थापन समितीवर

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य शासनाने "एक राज्य एक गणवेश"च्या निर्णयात पुन्हा बदल केले आहे. गतवर्षी राज्य शासनाने कापड खरेदी करून सर्व शाळांना त्याचे वितरण करण्याचे धोरण स्वीकारले होते. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना वेळेत गणवेश मिळू शकले नाहीत. त्यावर सर्वच क्षेत्रातून टीका झाली. या सर्व पार्श्वभूमीवर राज्य शासनाने आता गणवेश देण्याची जबाबदारी शाळा व्यवस्थापन समितीवर सोपविली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पूर्वीप्रमाणेच गणवेशचे वितरण केले जाणार आहे.

शालेय शिक्षण विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केलाआहे. माजी शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी "एक राज्य एक गणवेश' या संकल्पनेनुसार एकसमान एक रंगाचा दर्जेदार गणवेश देण्याबाबत घोषणा केली होती. त्यानुसार यंदाच्या शैक्षणिक वर्षात केंद्रीकृत पद्धतीने मोफत गणवेश योजना देताना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. मात्र, मोफत गणवेश योजनेचा लाभ पूर्वीप्रमाणेच विकेंद्रीकरण पद्धतीने देण्यात यावा,अशी मागणी करण्यात आली. त्यानुसार राज्य शासनाने पूर्वीप्रमाणेच शाळा व्यवस्थापन समितीद्वारे गणवेश योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

एक राज्य एक गणवेश या संकल्पनेनुसार विद्यार्थ्यांना एकसारखे दोन गणवेश देण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या गणवेशाची रचना आकाशी रंगाचा शर्ट आणि गडद निळ्या रंगाची हाफ पॅन्ट किंवा पॅन्ट अशी असावी. विद्यार्थिनींच्या गणवेशाची रचना आकाशी रंगाच्या बाह्या असलेला गडद निळ्या रंगाचा पिनो-फ्रॉक आकाशी रंगाचा शर्ट व गडद निळ्या रंगाचा स्कर्ट असावा.

तसेच ज्या शाळांमध्ये विद्यार्थिनींना सलवार कमीज असा गणवेश असेल तर तेथे गडद निळ्या रंगाची सलवार व आकाशी रंगाची कमीज अशी असावी. रंगानुसार गणवेश देण्याची जबाबदारी शाळा व्यवस्थापनाची राहील, असेही शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.



# 97 हजारांवर पुस्तके वापरून संविधान प्रतिकृती

## पुणे पुस्तक महोत्सवात तिसरा विश्वविक्रम

**पुणे | प्रतिनिधी**


पुणे पुस्तक महोत्सवात भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने पुस्तकरूपी संविधान प्रतिकृती उभारण्याचा जागतिक विश्वविक्रम शनिवारी करण्यात आला आहे. या साठी तब्बल ९७ हजारांपेक्षा अधिक पुस्तकांचा वापर करण्यात आला. त्यामुळे यंदाच्या पुस्तक महोत्सवात तिसरा विश्वविक्रम झाला आहे.

यावेळी राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे अध्यक्ष मिलिंद मराठे, संचालक युवराज मलिक, पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे, संयोजन समितीचे सदस्य प्रविण तरडे, बागेश्री मंठाळकर, प्रसेनजीत फडणवीस, राहुल पाखरे, डॉ. संजय चाकणे, मंदार जोशी, मिलिंद कांबळे, सुनील भंडगे, स्वामिराज भिसे आदी उपस्थित होते. या विक्रमाच्या निमित्ताने आकाशात रंगीबेरंगी फुगे सोडून, आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने हा विक्रम करण्यात आला आहे. या विक्रमाच्या निमित्ताने संविधानाचा सन्मान करण्याचा प्रयत्न आम्ही केले आहे. या विक्रमासाठी अविरतपणे काम केलेल्या सर्व टीमचे मनापासून आभार मानतो, अशी माहिती पांडे यांनी दिली.

पुस्तकांपासून तयार केलेले संविधानाचे हे सर्वात मोठे शिल्प आहे. त्यामुळे याची नोंद गिनीज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये झाली आहे. हे शिल्प साधारण १० मीटरचे आहे. त्यासाठी ९७ हजार २० पुस्तके वापरण्यात आली. साधारण ८० स्वयंसेवक आठ दिवसांपासून हा विक्रम होण्यासाठी कार्यरत होते, असे राहुल पाखरे यांनी सांगितले. या शिल्पाच्या आरखड्यासाठी पूजा मुंडे आणि स्वरूप कुलकर्णी यांनी मेहनत घेतली.

पुणे पुस्तक महोत्सवात पुस्तकरूपी संविधान प्रतिकृती पाहण्याची आज रविवारी २२ डिसेंबरला शेवटची संधी आहे. महोत्सवाला भेट देणाऱ्या नागरिकांना सकाळी १० ते रात्री १० या वेळेत विक्रमाचे शिल्प पाहता येणार आहे. त्यामुळे अधिकाधिक पुणेकरांनी पुणे महोत्सवाला भेट देऊन, पुस्तके खरेदी करावी आणि संविधानाचे शिल्प पाहावे, असे आवाहन राजेश पांडे यांनी केले.



# कचऱ्यावरून उद्योजक आणि पालिका आमने-सामने

## घातक कचरा विल्हेवाट प्रकल्प सुरु करण्यास पालिकेचा विरोध, कर भरूनही सुविधा पुरवत नसल्याने उद्योजकांची नाराजी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील एसआयडीसींमधील कंपन्यांमध्ये निर्माण होणाऱ्या हजारो किलो घातक कचऱ्याच्या प्रश्नावरून महापालिका प्रशासन आणि एमआयडीसीतील उद्योजक आमने-सामने आले आहेत. महापालिकेने एमआयडीसीमध्ये घातक कचरा विल्लेहवाट प्रकल्प उभारण्यास स्पष्ट शब्दांत नकार देत उद्योजकांनी मागणी धुडकावून लावली आहे.

पायाभूत सुविधा पुरवल्या जात नसल्याने उद्योजकांनी आपली नाराजी व्यक्त केला आहे. दरम्यान, उद्योजक आणि महापालिकेच्या भांडणात मात्र घातक कचऱ्याचा प्रश्न बिकट होत चालला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात पिंपरी , भोसरी, चिंचवड येथे एमआयडीसी आहेत. या एमआयडीसीमध्ये हजारो उद्योजक लहान-मोठे उद्योग करतात. यामध्ये रसायन, रंग, पेल्टिंग अशा विविध प्रकारच्या उद्योगांचा समावेश आहे. या उद्योगांमधून दररोज हजारो किलो घातक कचरा निर्माण होत आहे. रासायनिक पदार्थ, ज्वलनशिल पदार्थ, विषारी घटक असणारे, हवेत पसरणारे पदार्थांचा यामध्ये समावेश आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून शहरात हे लहान - मोठे उद्योग सुरू आहेत. महापालिका तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (एमआयडीसी) या उद्योगांना विविध प्रकारच्या सुविधा पुरवल्या जातात. रस्ते, पाणी, सांडपाणी, कचरा उचलणे, कचऱ्याचे विघटन करणे अशा प्रकारच्या सुविधा या अस्थापनांकडून पुरवल्या जातात. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून शहरातील एमआयडीसींमध्ये निर्माण होणाऱ्या घातक कचऱ्याकडे महापालिका तसेच इतर यंत्रणांनी दुर्लक्ष केले आहे.



### खासगी कंपनीकडे द्यावा लागतो घातक कचरा

» या प्रकल्प व्यवस्थापकांबरोबर करचा उचलण्याबाबतचे कोणतेही धोरण महापालिकेने ठरवून दिलेले नाही. महाराष्ट्र प्रदुषण महामंडळाने प्रत्येक उद्योगाला घातक कचरा निर्मितीचे प्रमाणपत्र दिले आहे. कंपनी त्या प्रमाणपत्रानुसारच कचरा उचलते. मात्र, अनेक उद्योगांचे उत्पादन वाढले असल्याने घातक कचरा निर्माण होण्याचे प्रमाणही वाढले आहे. प्रमाणपत्रावर दिलेला कचरा कंपनी उचलते मात्र, त्यापेक्षा जास्त कचरा असेल तर कंपनी उचलत नाही. त्यामुळे आता या उद्योगांना महाराष्ट्र प्रदुषण महामंडळाचे घातक कचऱ्याविषयीचे प्रमाणपत्र नव्याने काढून घ्यावे लागणार आहे. तेव्हाच त्यांच्याकडे निर्माण होणारा सर्व कचरा उचलला जाणार आहे.

> **"** घातक कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी ही संबंधित कारखानदार आणि उद्योगांची आहे. महापालिका एमआयडीसीमध्ये ओला, सुका कचरा दररोज उचलते. इतर कचरा उचलून त्यावर प्रक्रिया करते. मात्र, घातक कचरा उचलण्याची जबाबदारी संबंधित उद्योगांची आहे. या उद्योगांनी घातक कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावावी.
>
> - विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, महापालिका.

> **"** घातक कचऱ्याचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. शहरातील एमआयडीसींमधील घातक कचरा उचलण्याबाबत महापालिकेकडे अनेकदा मागणी केली आहे. मात्र, महापालिकेकडून केवळ ओला, सुखा कचरा उचलला जातो. घातक कचरा उचलण्यासंदर्भात तसेच या कचाऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी महापालिकने एमआयडीसीमध्ये एक प्रकल्प सुरु करायला हवा. घातक कचरा विल्हेवाट प्रकल्प सुरू करण्याबाबत महापालिकेकडे विनंती केली आहे. मात्र, महापालिकेने आमची विनंती मान्य केली नाही. महापालिकेला सर्वाधिक कर एमआयडीसीतील उद्योजकांकडून मिळतो. असे असतानाही उद्योजकांच्या महत्वाच्या मागण्या पूर्ण केल्या जात नाही, ही गोष्ट दुर्दैवी आहे.
>
> - संदीप बेलसरे, अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड लघुउद्योजक संघटना

# वर्षात तीन हजारांपेक्षा अधिक वृक्षांवर चालवली कुऱ्हाड

## विकासकामांच्या नावाखाली पालिका प्रशासनांकडून विविध ठिकाणच्या झाडांवर बिनबोभाट कुऱ्हाड चालवली जात आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

वर्षभरात तीन हजारांपेक्षा अधिक वृक्ष तोडणाऱ्या पिंपरी-चिंचवड महापालिकेला माझी वसुंधरा अभियान ४.० मध्ये प्रथम क्रमांक कसा काय देण्यात येतो? असा सवाल पर्यावरणप्रेमी नागरिकांकडून उपस्थित करण्यात येत आहे. विकासकामांच्या नावाखाली पालिका प्रशासनांकडून विविध ठिकाणच्या झाडांवर बिनबोभाट कुऱ्हाड चालवली जात आहे. शहरातील वृक्षांचे प्रमाण दिवसेंदिवस घटत चालले असताना वसुंधरा अभियानात शहराला पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे, या विरोधाभासाबद्दलही पर्यावरणप्रेमी संताप व्यक्त करत आहेत.

वृक्षारोपण माझ्या कुटुंबासाठी, माझ्या हरित शहरासाठी आणि एक पेड माँ के नाम अशा सारख्या उपक्रमात सर्वांना सामावून घेत विविध योजना यशस्वीरित्या राबवल्याबाबत राज्य शासनाचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार महापालिकेला देण्यात आला आहे. दुसरीकडेच याच महापालिकेने वर्षभरात शहरातील सुमारे तीन हजाराहून अधिक झाडे तोडण्यास परवानगी दिल्याची धक्कादायक बाबही उघड झाली आहे. शासनाचे मात्र याकडे दुर्लक्ष होत असताना दिसत आहे.

शहरातील हवेची गुणवत्ता दिवसेंदिवस ढासळत आहे. शहरातील प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे महापालिकेकडून दर वर्षी किमान एक लाख वृक्षारोपण केले जात असल्याचा दावा केला जातो. तर दुसरीकडे दर वर्षी महापालिकेकडूनच सुमारे तीन हजारांपेक्षा अधिक झाडे तोडण्यास परवानगी देण्यात येते. शिवाय विनापरवाना झाडांवर कुऱ्हाड घालण्यात येत असल्याने शहरातील झाडांची संख्या घटत असल्याचे निदर्शनास आले आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात उद्यान विभागाच्या वतीने वृक्षारोपण केले जाते. मात्र, वृक्ष तोडण्याचे प्रमाण कमी होत नसल्याचे दिसत आहे. वृक्षारोपण केलेल्या रोपांची योग्य काळजी घेत नसल्याने अनेक रोपे जळून जात आहेत. विकासकामाच्या नावाखाली शहरातील झाडांवर मोठ्या प्रमाणावर कुऱ्हाड चालवण्यात येत आहे. रस्त्याचे रुंदीकरण, पदपथावरील खोदकाम, भूमिगत सेवावाहिन्या, बांधकामे आणि इतर विकासकामांसाठी झाडे तोडली जात आहेत. तर, झाडांच्या फांद्यांमुळे जाहिरात फलक दिसत नसल्याने, दुकान किंवा कार्यालयास अडथळा, पानांचा कचरा होत असल्याने झाडे तोडली जातात. मेट्रोच्या कामास अडथळा होत असल्यानेही पिंपरी ते निगडी मार्गावरील झाडे तोडली आहेत. विनापरवाना झाडे तोडण्याच्या प्रमाणतही वाढ झाली आहे. उद्यान विभागाकडून खासगी जागेतील एक झाड तोडण्यासाठी केवळ दहा हजार रुपये शुल्क आकारले जाते. त्यामुळे शहरात बेसुमार वृक्षतोड होत आहे. अवैध वृक्षतोडीवर नियंत्रण ठेवण्यास महापालिकेच्या उद्यान विभागाला अपयश आल्याचे दिसून येत आहे.



### उद्यान की वृक्षतोड विभाग ?

» मागेल त्याला झाड तोडण्यास परवानगी देण्याचा उद्योग महापालिकेच्या उद्यान विभागाकडून चालविला जात आहे. विकासाच्या नावाखाली वृक्षतोड होत आहे. त्यामुळे हा उद्यान विभाग आहे की वृक्षतोड विभाग आहे असे विचार नव्हता पर्यावरणप्रेमींकडून होत आहे. विकासकामांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणामध्ये बांधकाम व्यवसायिकांकडून वृक्षतोड केली जात आहे. त्यामध्ये काही बांधकाम व्यवसायिक हे दोन झाडे तोडण्याची परवानगी घेऊन अधिक वृक्षतोड करत आहे. मात्र याकडे उद्यान विभागासह महापालिकेच्या संबंधित विभागांचे हेतूपुरस्सर दुर्लक्ष होताना दिसते. काही दिवसांपूर्वी एका बांधकाम व्यावसायिकाने नाशिक फाटा येथे बेकायदा वृक्षतोड केल्याची बाब उघडकीस आली. या प्रकरणी गुन्हा देखील दाखल करण्यात आला. परंतु संबंधित विकासकाम ठेकेदाराकडे सोपवण्यात आल्यामुळे वृक्षतोडीची जबाबदारी माझी नसल्याचे सांगत बांधकाम व्यवसाय करणे उच्च न्यायालयात धाव घेत त्याच्याविरुद्ध दाखल झालेल्या गुन्हाच रद्द ठरवण्यासाठी प्रयत्न चालवले आहेत.

# जिल्हा परिषद, पंचायत समितीला सर्वे करून उमेदवारी देणार : दिलीप वळसे पाटील

## आमदार दिलीप वळसे पाटील निवडून आल्याबद्दल आभार मेळाव्याचे आयोजन मंचर येथील शिवगिरी मंगल कार्यालयात करण्यात आले होते.

**पुणे | प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात पूर्वी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत गावातील प्रमुख कार्यकर्त्यांच्या इच्छेनुसार तेथील कार्यकर्त्याला संधी दिली जात होती. मात्र, या पुढील काळात जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत सर्वे करून ज्या कार्यकर्त्याला लोकांचा पाठिंबा आहे. अशा कार्यकर्त्यांचा विचार केला जाईल व उमेदवारी दिली जाईल, असे आवाहन माजी सहकार मंत्री आणि आमदार दिलीप वळसे पाटील यांनी शनिवार, दि. २१ रोजी केले.

आंबेगाव तालुका महायुतीच्या वतीने आमदार दिलीप वळसे पाटील निवडून आल्याबद्दल आभार मेळाव्याचे आयोजन मंचर येथील शिवगिरी मंगल कार्यालयात करण्यात आले होते.



### पक्षाचे दोन गट तयार केले

» निवडून आलेले संचालक पक्षासाठी वेळ देत नाही. याबाबत वळसे पाटलांनी नाराजी व्यक्त केली. १० वर्ष माझ्याकडे मंत्रीपद असताना तालुक्यातील महत्त्वाची जबाबदारी त्यांच्याकडे दिली. दहा वर्षांच्या काळात त्यांनी गावागावात फिरून पक्षाचे दोन गट तयार केले. त्यात आपले कार्यकर्ते ही सहभागी झाले. अशी टीका देवदत्त निकम यांचे नाव न देता केली.

यावेळी व्यासपीठावर शरद बँकेचे अध्यक्ष देवेंद्रशेठ शहा, उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, भीमाशंकर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे, उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील, शिरूर लोकसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष सचिन भोर, भाजपाचे तालुकाध्यक्ष संदीप बाणखेले, जिल्हा सचिव प्रमोद बाणखेले, बाजार समितीचे उपसभापती सचिन पानसरे,रामशेठ गावडे, किरणताई वळसे पाटील, पूर्वाताई वळसे पाटील, आंबेगाव तालुका खरेदी-विक्री संघाचे माजी अध्यक्ष अनिल वाळुंज, सुषमा शिंदे ,प्रकाश पवार, राजेंद्र गावडे, उद्योजक रमेशशेठ लबडे, लक्ष्मणराव काचोळे, बाबाजी टेमगिरे, सुनील बाणखेले,सचिन बांगर, सोपानराव नवले, सोमनाथ काळे, संतोष सैद आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना वळसे पाटील म्हणाले, पुढे येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी सर्वांनी कामाला लागा. समोरचा उमेदवार २४ तारखेपासून कामाला लागला आहे. जे पराभूत झाले ते गावच्या पाटलासारखे फिरत आहेत. आपण विजयी झालो तरी लाजत लाजत फिरत आहे.

### महायुतीच्या सर्व पक्षांना योग्य तो मानसन्मान द्यावा

» भाजपचे नेते जयसिंगराव एरंडे म्हणाले, मात्र, आता झालं गेलं विसरून जा खांद्याला खांदा लावून यापुढील निवडणूक आपल्या सर्वांना लढवायच्या आहेत. पंधराशे मतांनी निवडून आलेला निकाल कट्टर कार्यकर्त्याला मान्य नाही. निवडणूक काळात ज्या कार्यकर्त्यांनी पक्षासाठी रात्रीचा दिवस केला त्याची नोंद पक्षाने घ्यावी. या पुढील काळात महायुतीच्या होणाऱ्या निवडणुकांमध्ये महायुतीच्या सर्व पक्षांना योग्य तो मानसन्मान द्यावा, वळसे पाटील घेतील तो निर्णय आम्हाला मान्य आहे.

असेही वळसे पाटील म्हणाले. मात्र, मी बाहेर गेल्यानंतर तालुक्यात कोण लक्ष देणार,आपले सर्व कार्यकर्ते व्यवसाय, उद्योग करणारे पार्ट टाइम कार्यकर्ते असल्याने पूर्ण वेळ तालुक्याला देत नाहीत. आपण निवडणुकीच्या काळात जागे होतो. लोकसभा निवडणुकीच्या वेळी मी आजारी असल्याने सहा महिने माझा जनसंपर्क कमी झाला त्याचा परिणाम निवडणुकीवर झाला असेही वळसे पाटील म्हणाले, आंबेगाव तालुक्यात मार्केट कमिटी, कारखाना यावर निवडून येणारे संचालक यांना एक रुपया देखील खर्च करावा लागत नाही.

निरगुडसर येथील कन्या जानवी संजय वळसे पाटील यांनी दिलीप वळसे पाटील यांची प्रतिमा स्केचद्वारे तयार करून त्यांना भेट देण्यात आली. जागृती महाजन, क्रांतीताई गाढवे, जयसिंगराव एरंडे, जयश्री पलांडे,अरुण गिरे,नंदकुमार पिंगळे, इत्यादींची भाषणे झाली. प्रास्ताविक तालुका राष्ट्रवादीचे अध्यक्ष विष्णू काका हिंगे यांनी केले. सूत्रसंचालन निलेश पडवळ यांनी केले. तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अंकित जाधव यांनी आभार मानले.

# शेतकऱ्यांनी शेत जमिनीची ई-पीक पाहणी करावी

## असे आवाहन भोरचे तहसीलदार राजेंद्र नजन यांनी केले आहे, ई-पीक पाहणी डिजिटल क्रॉप सर्व्हे, मोबाईल अॅपद्वारे पीक नोंदणी करावयाचे काम सुरु आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

भोर तालुक्यातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील शेत जमिनीवरील ई-पीक पाहणी करून आपला सात बारा अद्ययावत करून घ्यावा, असे आवाहन भोरचे तहसीलदार राजेंद्र नजन यांनी केले आहे. महाराष्ट्र शासन, कृषी विभाग रब्बी हंगाम २०२४ पासून ई-पीक पाहणी डिजिटल क्रॉप सर्व्हे, मोबाईल ॲपद्वारे पीक नोंदणी करावयाचे काम सुरू आहे.



याची दोन प्रकारात नोंद केली जाणार असून यामध्ये शेतकरी स्तर व सहाय्यक स्तर मोबाईल ॲपद्वारे पिकांची नोंद करण्यात येणार आहे. शेतकरी स्तराचा कालावधी १ डिसेंबर २०२४ ते १५ जानेवारी २०२५ तर सहाय्यक स्तर १६ जानेवारी २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत ७/१२ वर रब्बी हंगामातील पिकांची ई-पीक पाहणीनुसार नोंदणी केली जाणार आहे.

यामध्ये सुरुवातीला शेतकरी स्तरावरून मोबाईल ॲपव्दारे ई-पीक पाहणी नोंद करण्यात येईल व शेतकरी स्तरावरील कालावधी संपल्यानंतर सहायकांमार्फत उर्वरित शेतकऱ्यांची पीक पाहणी मोबाईल ॲपद्वारे नोंदवण्यात येईल. तसेच डिजिटल क्रॉपमध्ये गटाच्या हद्दीवर आधारित जीओ फेन्सिग बंधनकारक करण्यात आलेले आहे. म्हणजेच जोपर्यंत संबधित खातेदार / सहायक निवडलेल्या गटात जाऊन पीक पाहणी करत नाही तोपर्यंत पिकांचे छायाचित्र काढता येत नाही व पीक पाहणी अपलोड करता येत नाही.

शेतकरी स्तराचा कालावधी १ डिसेंबर २०२४ ते १५ जानेवारी २०२५ तर सहाय्यक स्तर १६ जानेवारी २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत ७/१२ वर रब्बी हंगामातील पिकांची ई-पीक पाहणीनुसार नोंदणी केली जाणार आहे. जीओ फेन्सिग बंधनकारक असल्यामुळे गाव नकाशे अद्ययावत असल्याची खात्री भूमी अभिलेख कार्यालयामार्फत करून घेणे आवश्यक आहे. हे ई-पीक पाहणी केल्यामुळे आपणास पीक बीमा, पीक कर्ज, नैसर्गिक आपत्ती एमएसपी अंतर्गत पिकाची नोंद तसेच अँग्रोस्टॅक अंतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी फायद्याचे ठरणार असल्याचे तहसीलदार नजन यांनी सांगितले. भोर तालुक्यातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील शेत जमिनीवरील ई-पीक पाहणी करून आपला सात बारा अद्ययावत करून घ्यावा, असे आवाहन भोरचे तहसीलदार राजेंद्र नजन यांनी केले आहे.